## मेट्रो भुयारीकरणाचा ४१ वा टप्पा पूर्ण

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्गिकेतील भुयारीकरणाचा ४१ वा टप्पा (ब्रेकथ्रू) मंगळवारी यशस्वीरीत्या पार पडला. मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानकाचा हा टप्पा असून तानसा-२ या टीबीएस (टनेल बोरिंग मशीन) मशीनद्वारे हा टप्पा पूर्ण करण्यात आला आहे.

वृत्त...३

# भुयारीकरणाचा ४१ वा टप्पा पूर्ण

## मेट्रो ३ चे एकूण ९८.६० टक्के भुयारीकरण पूर्ण

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्गिकेतील भुयारीकरणाचा ४१ वा टप्पा (ब्रेकथ्रू) मंगळवारी यशस्वीरीत्या पार पडला. मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानकाचा हा टप्पा असून तानसा-२ या टीबीएस (टनेल बोरिंग मशीन) मशीनद्वारे हा टप्पा पूर्ण करण्यात आला आहे. या भुयारीकरणाच्या अनुषंगाने ५३.७८ किमीच्या (येणारी आणि जाणारी मार्गिका मिळून) भुयारीकरणातील ९८.६० टक्के काम पूर्ण झाल्याचा दावा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) केला आहे. त्याचवेळी कुलाबा ते सीप्झदरम्यानच्या डाऊनलाइनवरील संपूर्ण भुयारीकरण पूर्ण झाले आहे.

एमएमआरसीकडून ३३.५ किमीच्या भुयारी मेट्रो ३ मार्गाचे काम सुरू आहे. या कामात एकूण ५३.७८ किमी लांबीचे भुयारीकरण करण्यात येणार आहे. यात येणाऱ्या आणि जाणाऱ्या मार्गिकेचा समावेश आहे. त्यानुसार १७ टीबीएस मशीनच्या मदतीने हे काम करण्यात येत असून यातील काही टीबीएम भुयारीकरण पूर्ण करून भूगर्भातून बाहेर आल्या आहेत. भुयारीकरणाचा ४१ वा टप्पा (ब्रेकथ्रू) मंगळवारी पूर्ण करून तानसा-२ हे टीबीएम मशीन भूगर्भातून बाहेर आले आहे. या टप्प्याच्या अनुषंगाने महालक्ष्मी मेट्रो स्थानक ते मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानक असा ८३२.५ मीटरचा डाऊन लाईन मार्गाचा टप्पा पूर्ण झाला आहे.

तानसा-२ टीबीएम मशीनने २६२ दिवसात हे भुयारीकरण पूर्ण केले आहे. आतापर्यंत ९८.६० टक्के भुयारीकरण पूर्ण झाले असून लवकरच भुयारीकरणाचे १०० टक्के काम पूर्ण होईल, अशी माहिती महानगर आयुक्त एस.व्ही.आर. श्रीनिवास यांनी दिली.